# बिंदुवलय

एका बिंदूपासून सुरुवात झालेल्या आयुष्याची वळणे तो घेतो

३६० अंशाचा वर्तुळ पूर्ण करताना तो काटकोन त्रिकोणात राहतो

अचानक, वळणावरचा अनामिक 'स्व 'का उगाच जागा होतो

आडरानातला तो मोगरा अचानक खुलतो

काटकोन त्रिकोणात राहताना तो गुंत्यात गुंफतो

अंतर्वक्र -बहिर्वक्र वर्तुळात गुंतताना तो स्पंदनांनी ओळखतो

सूत्रांच्या गगनभेदी गाभ्यानी तो उड्डाणे घेतो

चौकोनातील निमिषाच्या हास्यांच्या लहरींनी तो स्वतःला बंधने घालतो

असा तो बिंदू अर्धवर्तुळ पूर्ण करतो

त्याच्या प्रवासाचा वेध घेत सुरु होतो मग वीणेच्या धाग्याने गुंतवतो

पूर्ण वर्तुळाच्या मागे पळताना तो धावतो

आलेखाच्या चढ-उतारात स्वत:लाच निरीक्षणाने पाहतो

गुणाकार ,भागाकारात तो स्वत:ला परावर्तित करत राहतो

बेरीज ,वजाबाकीच्या पद्धतीत तो पुढे जात असतो

बिंदू पुढेच पुढे जात असतो

अनामिकतेच्या या चक्रात सम-विषमतेच्या गर्दीत फिरतो

प्राक्तनाच्या छायेत तो स्वत:भोवतीच फिरत वाटचाल करतो

एका बिंदूपासून सुरुवात करून तो वलयातच सर्वांसमवेत राहतो

वर्तुळ पूर्ण करताना तो कृतकृत्य होतो

असा तो बिंदू स्वःताच वर्तुळ पूर्ण करतो.

---

--श्रुतिका होशिंग

शैक्षणिक वर्ष -२०१७-१९